नागरी संरक्षण प्रशिक्षण महाविद्यालय येथे प्रशिक्षण घेणाऱ्या उमेदवारांकडून घेण्यात येणाऱ्या प्रशिक्षण शुल्कात वाढ करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्र. सीडीएम २०१६/प्र.क्र. १४४/विशा-८,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक : ०३ मे, २०१८

वाचा : १. शासन निर्णय, गृह विभाग, क्र. सीडीएम-२९८६/१३९२, दिनांक १३ मार्च, १९९१
२. नागरी संरक्षण संचालनालयाचे पत्र क्र. नासंप्रम/प्रशिक्षण/५/२३/२००४/५०४, दि. २०.८.२००४
३. संचालक, नागरी संरक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई पत्र क्र. नासंसं/का-४/५/प्रशि./२०१६/७६४, दिनांक १७.५.२०१६
४. संचालक, नागरी संरक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई पत्र क्र. नासंसं/का-८/प्रशिक्षण/शुल्क वाढ/२०१६/, दिनांक २१.१०.२०१६

प्रस्तावना :

नागरी संरक्षण पथकेत्तर खाजगी संस्था, भारत सरकार व त्याचे उपक्रम यांचे कार्यालय, उद्योग, शैक्षणिक संस्था व इतर संस्था यांच्याकडून पुरस्कृत करण्यात आलेल्या उमेदवारांना नागरी संरक्षण प्रशिक्षण महाविद्यालय, मुंबई येथे प्रशिक्षण देण्याकरिता उपरोक्त संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णय, दिनांक १३ मार्च, १९९१ अन्वये नागरी संरक्षण प्रशिक्षण संरक्षण स्वयंसेवकांना तसेच नागरी संरक्षण पथक/घटकांच्या सदस्यांना प्रशिक्षण देण्यासाठी १ आठवड्यापर्यंत रुपये ५०/- प्रति व्यक्ती, २ आठवड्यापर्यंत रुपये १००/- प्रति व्यक्ती, ३ आठवड्यापर्यंत रुपये १५०/- प्रति व्यक्ती असे दर निश्चित करण्यात आले होते. त्यानंतर उपरोक्त संदर्भ क्र. २ येथील दिनांक १६.०६.२००४ च्या पत्रान्वये नागरी संरक्षण संचालनालयाने सदर शुल्कामध्ये रु. १००/- प्रतिदिन प्रति प्रशिक्षणार्थी असे दर निश्चित करण्यात आले होते. नागरी संरक्षण संचालनालयाने केलेल्या विनंतीनुसार आता सदर प्रशिक्षण शुल्कामध्ये प्रतिदिन प्रतिप्रशिक्षणार्थी रु. १०००/- (अक्षरी रु. एक हजार मात्र) एवढी वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

नागरी संरक्षण पथकेत्तर खाजगी संस्था, भारत सरकार व महाराष्ट्र शासन (उपक्रमासहित) कार्यालये, उद्योग, शैक्षणिक संस्था व इतर संस्था यांच्याकडून पुरस्कृत करण्यात आलेल्या उमेदवारांना नागरी संरक्षण प्रशिक्षण महाविद्यालय, मुंबई येथे प्रशिक्षण देण्याकरिता प्रशिक्षण शुल्कामध्ये प्रतिदिन प्रति प्रशिक्षणार्थी रु. १०००/- (रुपये एक हजार) इतकी वाढ करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

सदर शुल्क वाढ हा शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून लागू होईल.

२. प्रशिक्षणार्थींकडून आकारण्यात येणारे शुल्क "००७०- इतर प्रशासनिक सेवा, ६० इतर सेवा (१०६) नागरी संरक्षण, (००) (०२) नागरी संरक्षण प्रशिक्षण शुल्क (००७० ०८५१)" या लेखाशिर्षा मध्ये जमा करण्यात यावे.

३. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र. १/२०१७ साधनसंपत्ती, दि. ३/०१/२०१७ व अनौसं क्र. १२/२०१८ व्यय ८ दि.०५.०१.२०१८ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्यांचा संकेताक क्र. २०१८०५०३१७२६५६५३२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Deepak Vasant Sawant

Digitally signed by Deepak Vasant Sawant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=43cdfecb6fd26ff7b1b970520962ebf72d86546b92151214820b2bb31f3ccac8, serialNumber=66ea8e25496abe127ddbfd3157e10ae5a1fb12e738b63f8a5b2cb92885fd1f05, cn=Deepak Vasant Sawant
Date: 2018.05.08 12:52:26 +05'30'

(दि. व. सावंत)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत:

१. संचालक, नागरी संरक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखा परिक्षा) /(लेखा व अनुज्ञेयता)मुंबई
३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
४. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई
५. समादेशक, नागरी संरक्षण प्रशिक्षण महाविद्यालय, मुंबई
६. वित्त विभाग व्यय-८/(साधनसंपत्ती), मंत्रालय, मुंबई
७. निवड नस्ती, विशा-८